# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

## निवेदन

**बृहतसुचीवरुन गाळे वितरणासाठी दिनांक २७/०२/२०१३ व २२/१०/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात बृहतसुचीवरुन पात्र करण्यात आलेल्या भाडेकरु / रहिवाशी यांना गाळे वितरणाची यादी.**

मुंबई बेटावरील ज्या उपकरप्राप्त इमारती काही अपरिहार्य कारणास्तव पुनर्रचित होवू शकत नाहीत अशा मुळ भाडेकरु / रहिवाशी यांना तसेच मूळ उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत, परंतु कमी गाळे बांधले गेले आहेत अशा वंचित मुळ भाडेकरु / रहिवाशी यांची पात्रता निश्चित करुन बृहतसुचि समितीद्वारे पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरुपी गाळे वितरण करण्यात येते. यासंबंधी प्राधिकरणाने दिनांक ०३/०३/२०११ रोजी ठराव क्रं. ६५२० अन्वये धोरणात्मक निर्णय घेवून मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. (सदरचा ठराव म्हाडाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.) तद्अनुषंगाने मंडळातर्फे दिनांक २७/०२/२०१३ व २२/१०/२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन बृहतसुचीवरुन गाळे वितरणासाठी अर्ज मागविण्यात आले. सदर प्राप्त अर्जावर निश्चित केलेल्या धोरणानुसार बृहतसुची समितीद्वारे छाननी करुन, सुनावणी घेवून. पात्र / अपात्रतेबाबतचा निर्णय घेण्यात येवून दिनांक ०६/०९/२०१४ रोजी पात्र / अपात्र अर्जदारांची "प्रारुप" यादी प्रसिध्द करण्यात आली. सदर प्रारुप यादीनुसार सुमारे ३२३ अर्जदार पात्र, ११२५ अर्जदार अपात्र व ४९ प्रकरणे अनिर्णित ठेवण्यात आले होते. सदर प्रारुप यादी प्रसिध्द झाल्यानंतर दिनांक १७/०९/२०१४ ते ०७/१०/२०१४ या कालावधीमध्ये बृहतसुची समितीद्वारे घेतलेल्या निर्णयांबाबत हरकती / सुचना / आक्षेप मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने सुमारे ८२९ प्रकरणी हरकती / सुचना / आक्षेप प्राप्त झाले होते. विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या हरकती / सुचना / आक्षेप यांची छाननी करुन, तसेच आवश्यक प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर बृहतसुचीसमितीने अंतिमतः ३२३ अर्जदारांना गाळे वितरणासाठी पात्र केले आहे.

म्हाड अधिनियम १९७६, विनियम १९८१ तसेच प्राधिकरणाने बृहतसुचीवरुन गाळे वितरणासाठी ठराव क्रं. ६५२०, दिनांक ०३/०३/२०११ अन्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार एकुण **१४९७** अर्जदारापैकी बृहतसूची समितीद्वारे **३२३** पात्र अर्जदारांची गाळे वितरणाची यादी म्हाडाचे संकेत स्थळ www.mhada.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात येत असून यादीमध्ये नमुद अर्जदारांना देकारपत्र टपालाद्वारे पाठविण्यात येत आहे. तसेच **९३४** अपात्र अर्जदारांची यादी अपात्र होण्याच्या कारणासह प्रसिध्द करण्यात येत आहे. **२४०** अर्जदारांबाबत छाननीची प्रक्रिया सुरु असून लवकरच बृहतसूची समितीद्वारे पात्र / अपात्रतेबाबत निर्णय घेण्यात येवून पात्र भाडेकरु / रहिवाशी यांची गाळे वितरणाची यादी प्रसिध्द केली जाईल. छाननीची प्रक्रिया सुरु असलेली सदर **२४०** अर्जदारांची यादी माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

बृहतसूची समितीद्वारे ३२३ पात्र भाडेकरु / रहिवाशी यांची गाळे वितरणाची यादी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. पात्र अर्जदारांपैकी अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे बनावट आढळल्यास तसेच चुकीची व खोटी माहिती देवून मंडळाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अर्जदारांना वितरीत करण्यात आलेल्या गाळयाचे वितरण रद्द करण्यात येईल व अशा अर्जदारांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

२. पात्र अर्जदारांपैकी ज्या अर्जदारांना यापूर्वी गाळे वितरण झाले असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अर्जदारांना वितरीत करण्यात आलेल्या गाळयाचे वितरण रद्द करण्यात येईल व अशा अर्जदारांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

३. प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यात बदल करण्याचा अधिकार बृहतसुची समितीने राखुन ठेवला आहे.

मुख्य अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई